RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ६, अंक २८]      सोमवार, ऑक्टोबर ५, २०२०/आश्विन १३, शके १९४२      [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

### असाधारण क्रमांक ४३

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०२० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६.—** महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम . . . . . . . . | पृष्ठे १-२ |

दिनांक १ ऑक्टोबर २०२० रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**भूपेन्द्र मु. गुरव,**
प्रभारी सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

### सन २०२० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक ५ ऑक्टोबर २०२० रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

१९५० चा २९. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी, आता,** भारतीय गणराज्याच्या एकाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१९५० चा २९. **१.** या अधिनियमास, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) अधिनियम, २०२० असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९५० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ यांच्या कलम ५ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम याच्या कलम ५ मध्ये, पोट-कलम (२अ) मधील,—

(क) खंड (क) मध्ये, शेवटी " ; किंवा " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) खंड (क) नंतर, पुढील खंड जादा दाखल करण्यात येईल :—

" (ड) जी व्यक्ती, खंड (क) खाली समाविष्ट नाही, आणि जी व्यक्ती, कायद्याद्वारे स्थापन करण्यात आलेल्या कोणत्याही विद्यापीठाची किंवा राज्य शासनाने याबाबतीत मान्यता दिलेल्या इतर कोणत्याही विद्यापीठाची कायद्याची पदवी धारण करीत असेल आणि जिने, अशी पदवी प्राप्त केल्यानंतर, धर्मादाय संस्थेत, अधीक्षक किंवा जनसंपर्क अधिकारी किंवा विधि सहायक पदावर ३ वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी सेवा केली असेल आणि जिने धर्मादाय आयुक्ताकडून विहित करण्यात आलेल्या नियमांनुसार घेण्यात येणारी विभागीय परीक्षा उत्तीर्ण केली असेल, अशी व्यक्ती.".

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.